# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक २६५/२०२४ दिनांक:- १६/०७/२०२४.

## "बँक खात्याची KYC अपडेट करावयाचे सांगुन तक्रारदार यांची ऑनलाईन केलेली फसवणुकतील ४,७७,४५८/- रक्कम परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश"

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील मिरारोड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात राहणारे तक्रारदार नामे श्री. सिंघल यांना बँकेतुन बोलत असल्याचे सांगुन अनोळखी मोबाईल धारकाने फोन केला. तक्रारदार यांचे बँक खात्याची **KYC** अपडेट केलेली नसल्याने पुढील व्यवहार करता येणार नाही असे सांगितले. खात्यातील व्यवहार सुरळित ठेवण्याकरीता **KYC** तात्काळ अपडेट करावायचे असल्यास वैयक्तिक माहिती देण्यास सांगितले. तक्रारदार यांनी त्यांची वैयक्तिक माहिती दिली असता त्यांचे खात्यातुन ४,७७,४५८/- **रु कपात** झाल्याचा मॅसेज प्राप्त झाला. तक्रारदार यांची आर्थिक फसवणुक झाल्याबाबत तक्रारी अर्ज सायबर पोलीस ठाणे येथे दिल्याने सदरबाबत नोंद घेण्यात आलेली आहे.

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्र.१३९९/२०२४ दिनांक १५/०६/२०२४.)**

वरील प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार यांचे व्यवहारचे अवलोकन केले असता फसवणुक झालेली रक्कम ऑनलाईन मर्चंट च्या माध्यमातुन पुढे वळती झाल्याचे दिसुन आले.त्या अनुषंगाने संबंधीतांना तात्काळ पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम गोठवुन मुळ खात्यात परत करण्याबाबत कळविण्यात आले.

**सदर पत्रव्यवहाराचे अनुषंगाने तक्रारदार यांची फसवणुक झालेली पुर्ण रक्कम ४,७७,४५८/- त्यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेली आहे.**

**फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **अनोळखी लिंक अगर मॅसेज प्राप्त झाल्यास पडताळणी केल्याशिवाय कारवाई करु नये.**
- **अनोळखी मोबाईल धारकांना आपली वैयक्तिक माहिती/ आर्थिक व्यवहारासंबंधीत माहिती उघड करु नये. आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० तसेच www.cybercrime.gov.in वर संपर्क करुन आपली तक्रार नोंदवावी.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/प्रसाद शेनोळकर, मपोअं/१३१०४ पल्लवी निकम, मपोअं/२३६३९ स्नेहल पुणे, पोअं/२२००३ कुणाल सावळे, मसुब/प्रविण सावंत यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**